## नि.दि.मु.क्र. ३२/२०२० मधील आय.ए.नं. ०१/२०२२ (निशाणी २३) वरील आदेश

प्रस्तुत अर्ज हा प्रतिवादी क्र. १२ व १३ यांनी कैफियत स्वीकारण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादी क्र. १२ व १३ यांचे असे म्हणणे आहे की त्यांना समन्सची बजावणी झाल्यानंतर कोरोना रोगाच्या प्रार्दुभावामुळे त्यांना वकिलांना भेटून मुदतीत कैफियत दाखल करणे शक्य झालेले नाही. त्यामुळे त्यांची कैफियत स्वीकारण्यात यावी अशी त्यांनी विनंती केली. यावर वादींनी म्हणणे दाखल करुन अर्जात दिलेले कारण संयुक्तीक नाही असे कथन केलेले आहे. त्याचप्रमाणे वादी वयोवृध्द इसम असून त्याला न्यायापासून वंचीत ठेवण्याकरीता प्रतिवादी क्र. १२ व १३ वेळ काढीत आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे न्यायपुर्ततेकरीता अर्ज मंजूर केल्यास खर्च आकरण्यात यावा अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

**०३.** दोन्ही बाजूंच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन करता प्रतिवादी क्र. १२ यास दि. २४/११/२०२० रोजी दावा समन्सची बजावणी झालेली आहे. तसेच प्रतिवादी क्र. १३ हे दि. ०१/०४/२०२१ रोजी स्वतः न्यायालयात हजर झालेले आहेत. प्रतिवादी क्र. १२ व १३ यांनी सदर अर्ज दि. ०६/१२/२०२१ रोजी दिलेला आहे. त्यांचे विरुध्द एकतर्फा अथवा विनाकैफियत आदेश झालेला नाही. मात्र हे स्पष्ट आहे की त्यांनी त्यांची कैफियत मुदतीत दाखल केलेली नाही. तसेच दरम्यानचे काळात कोरोना प्रादुर्भावामुळे न्यायालयीन कामकाज प्रभावीत झाले होते ही बाब देखील विसरता येणारी नाही. नैसर्गिक न्यायतत्त्वाच्या आधारे दोन्ही बाजूंना त्यांचे म्हणणे

मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. दाव्याचे स्वरुप पाहता व दाव्यामध्ये दोन्ही बाजूंच्या हक्काबाबतचा निर्णय होणार असल्याने प्रतिवादी क्र. १२ व १३ यांना त्यांची कैफियत दाखल करण्याची परवानगी देणे उचित होईल असे मला वाटते. अर्जातील कारणांचा विचार करता कोणताही खर्च आकारणे उचित होणार नाही असे मला वाटते. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येतो.

प्रतिवादी क्र. १२ व १३ यांना कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात येते व त्यांची कैफियत स्वीकारण्यात येते.

Digitally signed by BHANUPRATAP B. CHOUHAN
Date: 2022.01.17 15:58:53 +0530

दि. १७/०१/२०२२ भानुप्रताप ब. चौहान
मालवण दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

“CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER/JUDGMENT.”

Chandrakala Vasant Chavan
NAME OF STENOGRAPHER